



दैनिक **युवावार्ता**

परिवर्तनाचा पुरस्कर्ता


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25






अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १२१ । किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । २०/०५/२०२६ । पाने - ४


# सलग दुसऱ्यांदा इंधन दरवाढ

## सर्वसामान्यांचे महागाईने कंबरडे मोरडणार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा एकदा कात्री लागली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे देशांतर्गत बाजारात पेट्रोल आणि डिझेलच्या दरांनी पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. मंगळवारी (१९ मे २०२६) देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सरासरी ९० पैशांची वाढ करण्यात आली आहे. इंधनाच्या दरात चालू आठवड्यात झालेली ही दुसरी दरवाढ आहे. यामुळे ऐन उन्हाळ्यात महागाईची झळ सोसणाऱ्या सर्वसामान्यांचे बजेट कोलमडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यापूर्वी गेल्या शुक्रवारीच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात थेट ३ रुपयांची मोठी वाढ करण्यात आली होती. त्यानंतर आता अवघ्या काही दिवसांतच पुन्हा ९० पैशांची वाढ झाल्याने महागाईचा भडका उडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईत इंधनाचे दर नेहमीच इतर मेट्रो शहरांच्या तुलनेत चढे असतात. मंगळवारच्या दरवाढीनंतर मुंबईत पेट्रोल ९१ पैशांनी महागले असून, आता एक लीटर पेट्रोलसाठी मुंबईकरांना १०७.५९ रुपये मोजावे लागत आहेत. तर दुसरीकडे डिझेलच्या दरात ९४ पैशांची वाढ झाली असून, मुंबईत डिझेल ९४.०८ रुपये प्रतिलीटरवर पोहोचले आहे.

देशाची राजधानी दिल्लीमध्ये पेट्रोल ८७ पैशांनी महागून ९८.६४ रुपये प्रतिलीटर झाले आहे, तर डिझेल ९१ पैशांच्या वाढीसह ९१.५८ रुपये प्रतिलीटरवर विकले जात आहे. कोलकातामध्ये पेट्रोलमध्ये सर्वाधिक म्हणजेच ९६ पैशांची वाढ झाली असून तिथे पेट्रोलचा दर १०९.७० रुपयांवर पोहोचला आहे.पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनंतर इंधन दरवाढीचे सत्र पुन्हा सुरू होईल, अशी शक्यता आधीपासूनच वर्तवली जात होती. त्यानुसार आता पेट्रोलियम कंपन्यांनी दरवाढीचा धडाका लावला आहे. शुक्रवारी झालेली ३ रुपयांची वाढ आणि आजची ९० पैशांची वाढ मिळून, सर्वसामान्यांवर अवघ्या एका आठवड्यात प्रतिलिटर ३ रुपये ९० पैशांचा अतिरिक्त बोजा पडला आहे.

# अनधिकृत बांधकामांवर चालणार बुलडोझर

## २० आर्किटेक्ट काळ्या यादीत, पार्किंग नसलेल्या आस्थापनांवरही होणार कारवाई




**शहराच्या विकासाच्या नावाखाली वाढणाऱ्या अनधिकृत बांधकामांनी अनेक वर्षांपासून वाहतूक, पार्किंग, सुरक्षितता आणि शहर नियोजनाचे प्रश्न गंभीर केले होते. आता पालिकेने घेतलेल्या कठोर भूमिकेमुळे नियम मोडणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून आगामी काळात शहरातील बांधकाम क्षेत्रात मोठे बदल पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. नागरिकांनीही बांधकामासंदर्भातील नियमांची माहिती घेऊनच पुढे जाणे गरजेचे असल्याचे स्पष्ट संकेत या कारवाईतून मिळत आहेत.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील अनधिकृत बांधकामांना आता मोठा झटका बसण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. शहरातील मंजूर आराखड्यापेक्षा अधिक किंवा नियमबाह्य उभारण्यात आलेल्या व्यावसायिक बांधकामांविरोधात संगमनेर नगरपालिकेने कठोर भूमिका घेतली असून, नियम मोडणाऱ्यांवर थेट कारवाईचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तब्बल २० आर्किटेक्टना काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्यात आल्याची धक्कादायक माहिती मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नगरपालिकेत आयोजित पत्रकार परिषदेला नगररचना विभागाचे अधिकारी ओंकार सहाणे आणि वैष्णवी गडाख उपस्थित होते. यावेळी मुख्याधिकारी गोरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत व्यावसायिक बांधकामे झाल्याचे पालिकेच्या निदर्शनास आले आहे. यापुढे मंजूर आराखड्यानुसारच बांधकाम करणे बंधनकारक असेल. नियम मोडून बांधकाम करणाऱ्यांना दुप्पट शास्ती (दंड) आकारला जाणार आहे.

त्यांनी नागरिकांनाही सावध करत म्हटले की, अनेक वेळा आर्किटेक्ट किंवा एजंटमार्फत चुकीची माहिती देऊन नागरिकांची फसवणूक केली जाते. त्यामुळे कोणतेही बांधकाम सुरू करण्यापूर्वी किंवा मंजुरीसंदर्भात थेट पालिकेच्या नगररचना विभागाशी संपर्क साधून खात्री करण्याचे आवाहन करण्यात आले.

दरम्यान, शहरातील अनधिकृत फ्लेक्स आणि होर्डिंग्जविरोधात पालिकेने सुरू केलेल्या मोहिमेचे सकारात्मक परिणाम दिसू लागल्याचेही त्यांनी सांगितले. यामुळे शहराचे विद्रुपीकरण थांबले असून शहर अधिक स्वच्छ आणि आकर्षक दिसू लागल्याचा दावा करण्यात आला.

याशिवाय शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी लवकरच नसबंदी मोहीम राबवण्यात येणार आहे. मोकाट जनावरांवरही कारवाई सुरू असून शहरातील घनकचरा प्रकल्पातून तयार होणाऱ्या सेंद्रिय खताला बाजारात मोठी मागणी निर्माण झाली असल्याचे सांगण्यात आले. (पान ३ वर)

# तालुक्याला हक्काचे पाणी आणि अकरा तास वीज मिळालीच पाहिजे - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - निळवंडे धरण आणि डावा व उजवा कालवा आपण अनेक अडचणींवर मात करून पूर्ण केले. संगमनेर तालुक्याने पाण्यासाठी नेहमीच संघर्ष केला असून निळवंडे धरणाचे ६० टक्के पाणी हे संगमनेर तालुक्याचे आहे. संगमनेरला हक्काचे पाणी व ११ तास वीज मिळालीच पाहिजे अशी मागणी काँग्रेस पक्षाचे नेते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. तर प्रत्येक शेतकऱ्यांनी एकरी १०० टन ऊस उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवा असे आवाहन त्यांनी केले.

खांडगाव येथील खांडेश्वर सांस्कृतिक मंगल कार्यालयात सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने ऊस विकास मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी जेष्ठ शेतकरी किसन दादा गुंजाळ हे होते तर व्यासपीठावर ॲड.माधवराव कानवडे, कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पा. घुले, व्हीएसआयचे शास्त्रज्ञ डॉ.अशोक कडलग, डॉ. अभिनंदन पाटील, रामहरी कातोरे, आर. बी. राहणे, रमेश गुंजाळ, कारखान्याचे संचालक विनोद हासे, गुलाबराव देशमुख, अरुण वाकचौरे, संपतराव गोडगे, बंडू नाना भाबड, सतीश वर्पे, अंकुश ताजणे, विलास शिंदे, नवनाथ आरगडे, विजय राहणे, योगेश भालेराव, रामनाथ कुटे, सौ.लताताई बाबासाहेब गायकर, सुंदराबाई रावसाहेब दुबे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, संगमनेर तालुक्याला संघर्षाचा इतिहास आहे. निळवंडे धरण व कालवे आपण मोठ्या अडचणीवर मात करून पूर्ण केले. डाव्या व उजव्या कालव्याला पाणी सुरू आहे. डाव्या कालव्याला काँक्रिटीकरण केल्याने पाणी पुढे जात आहे. संगमनेरला हक्काच्या पाण्याबरोबर न्यायालयाच्या निर्णयानुसार रोटेशन काळामध्ये ११ तास वीज मिळालीच पाहिजे अशी मागणी मागणी त्यांनी केली. याकरता कार्यकर्त्यांसह सर्व शेतकरी नागरिकांना एकत्रित येऊन संघर्ष करावा लागेल.

ऊस व दूध हे शाश्वत पीक असून उसाचे क्षेत्र वाढवणे आणि एकरी १०० टन उत्पादन घेणे हे उद्दिष्ट शेतकऱ्यांनी ठेवले पाहिजे. तीच जमीन तेच पाणी आणि कमी श्रम यात एकरी १०० टन उत्पादन (पान २ वर)

# गोवंश कत्तल प्रकरणात पोलिसांचा मोठा दणका

## आरोपींवर 'मोक्का' धर्तीवरील संघटित गुन्हेगारीचे कलम लागू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरमध्ये गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर कत्तल करणाऱ्या टोळीविरोधात पोलिसांनी मोठी आणि कठोर कारवाई करत आरोपींवर आता 'मोक्का' धर्तीवरील संघटित गुन्हेगारीचे कलम लागू केले आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १११ अंतर्गत ही कारवाई करण्यात आल्याने अवैध कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १४ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री संगमनेरमधील जमजम कॉलनी, गल्ली क्रमांक ६ येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तल सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी तातडीने छापा टाकत घटनास्थळावरून तब्बल ९५० किलो गोमांस, चाकू, डिजिटल वजन काटा आणि इतर साहित्य असा २ लाख ८७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. या प्रकरणी नवाज जावेद कुरेशी, समद जावेद कुरेशी, नावेद जावेद कुरेशी आणि इतर तीन ते चार अनोळखी व्यक्तींविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान आरोपींविरुद्ध यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. आर्थिक लाभ मिळवण्यासाठी त्यांनी संघटित टोळी तयार करून जनावरांना चारा-पाणी न देता डांबून ठेवणे, कत्तलीसाठी वाहतूक करणे आणि गोमांस विक्री करणे असे बेकायदेशीर प्रकार सातत्याने सुरू ठेवल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले.

यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांनी आरोपींवर संघटित गुन्हेगारीचे कलम लावण्याचा प्रस्ताव श्रीरामपूर अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे पाठवला होता. त्यास मंजुरी मिळाल्यानंतर आरोपींवर कलम १११ अंतर्गत वाढीव कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समीर बारवकर, सपोनि. सचिन वाकडे आणि त्यांच्या पथकाने केली. संगमनेरमध्ये अवैध गोवंश कत्तलीविरोधात पोलिसांनी उचललेले हे पाऊल भविष्यात अशा गुन्हेगारी प्रवृत्तींना मोठा आळा घालणारे ठरणार असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

### एक आरोपी जेरबंद; दोन मुख्य आरोपी फरार

**या कारवाईत पोलिसांनी टोळीतील समद जावेद कुरेशी (वय २८, रा. जमजम कॉलनी, संगमनेर) याला अटक केली आहे. मात्र, नवाज जावेद कुरेशी आणि नावेद जावेद कुरेशी हे दोन्ही मुख्य आरोपी अद्याप फरार आहेत. त्यांच्या संदर्भात माहिती असल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**









# संपादकीय...

## वाढते तापमान आणि आटते जलस्रोत; बचत हीच भविष्यातील हमी

राज्यात दिवसेंदिवस वाढणारे तापमान आणि झपाट्याने कमी होत चाललेला पाणीसाठा ही आजची सर्वात गंभीर समस्या बनली आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना राज्यातील अनेक भागांमध्ये पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी तर सोडाच, पण पिण्याच्या पाण्यासाठीही नागरिकांना संघर्ष करावा लागत आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुष्काळाच्या झळा तीव्रपणे जाणवत आहेत. अनेक मोठ्या धरणांमधील पाणीसाठा तळाला पोहोचत असून विहिरी, कूपनलिका आणि बोअरवेल आटू लागल्या आहेत. त्यामुळे अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे.

राज्यातील धरणांमधील उपयुक्त पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे. काही महिन्यांपूर्वी समाधानकारक वाटणारा साठा आता धोक्याच्या पातळीवर पोहोचला आहे. परिणामी अनेक शहरांमध्ये चार ते पाच दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जात आहे. अनेक गावे आणि वाड्या-वस्त्या पूर्णपणे टँकरवर अवलंबून आहेत. काही गावांमध्ये आठ दिवसांतून एकदा तर काही ठिकाणी पंधरा दिवसांतून एकदा टँकर येतो. त्यामुळे महिलांना, वृद्धांना आणि लहान मुलांना हंडाभर पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागत आहे. पाण्यासाठी होणारी ही वणवण ग्रामीण जीवन अधिक कठीण बनवत आहे. पाण्याच्या टंचाईचा सर्वाधिक परिणाम शेती क्षेत्रावर होत आहे. पाणीअभावी अनेक ठिकाणी पिके करपली आहेत. शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून जनावरांसाठी चारा आणि पाणी उपलब्ध करणेही कठीण झाले आहे. अनेक भागांत जनावरांना टँकरच्या पाण्यावर जगावे लागत आहे. मुकी जनावरे आणि पक्षीदेखील पाण्यासाठी भटकताना दिसत आहेत. त्यामुळे ही केवळ माणसांचीच नव्हे तर संपूर्ण पर्यावरणाची समस्या बनली आहे. हवामान खात्याने आणि विविध हवामान संस्थांनी यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे भविष्यातील संकट आणखी गडद होण्याची शक्यता आहे. पावसाचे आगमन वेळेत झाले तरी पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास दुष्काळाची तीव्रता वाढू शकते. मात्र ही परिस्थिती केवळ कमी पावसामुळे निर्माण झालेली नाही. भूजलाचा अनियंत्रित उपसा, पाण्याचे अयोग्य नियोजन, जलस्त्रोतांचे असमान वितरण आणि पाण्याचा मोठ्या प्रमाणावर होणारा अपव्यय हीदेखील त्यामागील महत्त्वाची कारणे आहेत. शहरी भागात आजही मोठ्या प्रमाणावर पाण्याची नासाडी होताना दिसते. अनेक ठिकाणी नळ सुरू ठेवले जातात, वाहन धुण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी वापरले जाते तसेच आवश्यकतेपेक्षा अधिक पाणी खर्च केले जाते. पुणे, मुंबईसारख्या महानगरांमध्ये चोवीस तास पाणीपुरवठा होत असल्याने अनेकांना पाण्याचे महत्त्व जाणवत नाही. परंतु ग्रामीण भागातील नागरिकांची अवस्था पाहिली तर प्रत्येक थेंब किती मौल्यवान आहे याची जाणीव होते. त्यामुळे शहरांमध्येही आवश्यक तितक्याच पाण्याचा वापर होणे गरजेचे आहे. पाण्याच्या संकटावर मात करण्यासाठी केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून राहून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने स्वतःहून जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. घरगुती वापरात पाणी जपून वापरणे, पावसाचे पाणी साठवणे, झाडे लावणे, जलसंधारणाची कामे करणे, शेतांमध्ये ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर वाढवणे यासारख्या उपाययोजना मोठ्या प्रमाणावर राबवायला हव्यात. गावपातळीवर पाण्याचे योग्य व्यवस्थापन झाले तर भविष्यातील संकट मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. आज पाणी वाचवले तरच उद्याची पिढी सुरक्षित राहू शकते. पाणी हेच जीवन आहे आणि पाण्याशिवाय कोणतेही जीवन शक्य नाही.

# धोकादायक कुत्र्यांना मारून टाका - सर्वोच्च न्यायालय



मुंबई (वृत्तसंस्था)

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी सांगितले की, धोकादायक आणि आजारी कुत्र्यांना इंजेक्शन देऊन मारले जाऊ शकते. लोकांच्या जीविताची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. जो अधिकारी निर्देश पाळणार नाही, त्याच्यावर अवमाननेचा खटला चालवला जावा. न्यायालयाने या प्रकरणात सर्व याचिका फेटाळून लावल्या.

केवळ राजस्थानमधील श्रीगंगानगर शहरात एका महिन्यात कुत्र्यांच्या चावण्याच्या १०८४ घटना समोर आल्या. अहवालानुसार लहान मुलांना गंभीर दुखापती झाल्या, चेहऱ्यावर खोल जखमा झाल्या. तामिळनाडूमध्ये वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांतच कुत्र्यांच्या चावण्याच्या सुमारे २ लाख घटना नोंदवल्या गेल्या. नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शाळा, रुग्णालये, बस स्टँड, रेल्वे स्टेशन यांसारख्या सार्वजनिक ठिकाणांहून भटक्या कुत्र्यांना हटवण्याचे निर्देश जारी केले होते. कुत्र्यांना निवारागृहात ठेवावे आणि त्यांना परत सोडू नये असे म्हटले होते. रस्त्यांवर कुत्र्यांना खायला घालण्यावरही बंदी घातली होती. यानंतर, श्वानप्रेमी आणि स्वयंसेवी संस्थांनी हे निर्देश रद्द करण्यासाठी अर्ज केला होता.

न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी केली. मागील सुनावणी २९ जानेवारी रोजी झाली होती, ज्यात खंडपीठाने निर्णय राखून ठेवला होता. यावेळी राज्ये, नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया आणि ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया यांनी युक्तिवाद सादर केले होते.

न्यायालयाने म्हटले होते की, भटक्या कुत्र्यांच्या कोणत्याही हल्ल्यात दुखापत किंवा मृत्यू झाल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थांबरोबरच डॉग फीडर्सची जबाबदारीही निश्चित केली जाऊ शकते. आमच्या निरीक्षणांना विनोद समजणे चुकीचे ठरेल. आम्ही गंभीर आहोत. न्यायालय जबाबदारी निश्चित करण्यापासून मागे हटणार नाही, कारण सध्याच्या व्यवस्थेत स्थानिक प्रशासनाचे अपयश समोर आले आहे.

# सायखिंडी येथे कृषीदूत शेतकऱ्यांच्या बांधावर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेर तालुक्यातील सायखिंडी येथे मालदाड येथील श्रमशक्ती कृषि महाविद्यालयाच्या कृषीदूतांचे आगमन झाले असून ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

कृषी जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नक कार्यक्रमाच्या माध्यमातून हे कृषीदूत गावामध्ये वास्तव्यास राहून शेतकरी व ग्रामीण भागाशी प्रत्यक्ष संवाद साधत कृषीविषयक मार्गदर्शन करणार आहेत. सेवा संस्कार संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या श्रमशक्ती कृषि महाविद्यालय, मालदाड येथील विद्यार्थी शिक्षण घेत असून संस्थेचे अध्यक्ष मा. साहेबराव नवले पाटील यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश साकोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. कार्यक्रम समन्वयक प्रा. निलेश तायडे सर व कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. डी. तायडे सर आणि सर्व विषय विशेषज्ञ यांच्या सूचनेनुसार कृषीदूत अथर्व भालेराव, ज्ञानेश्वर सावंत, दिग्विजय पवार, समर्थ निकम, सोहम रोकडे व ओंकार हांडे हे सायखिंडी गावात वास्तव्यास राहून शेतकऱ्यांच्या समस्या, अनुभव व शेतीपद्धती जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषीदूत शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीज प्रक्रिया, गांडूळ खत निर्मिती, चारा पिके, फळबाग व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय, आधुनिक सिंचन पद्धती, बायोगॅस आदी विषयांवर माहिती व मार्गदर्शन देणार आहेत. यावेळी सायखिंडी गावच्या सरपंच सौ. नीलमताई पारधी, उपसरपंच श्री. दिपक करंजकर, ग्रामपंचायत कर्मचारी, प्रगतशील शेतकरी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साकुर परिसरातील प्रलंबित प्रश्नांबाबत सौ. कोळपकर यांचे पालकमंत्र्यांना निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील बिरेवाडी येथे विविध विकासकामे व रस्त्यांच्या भूमिपूजन कार्यक्रमावेळी साई सिद्धी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. अमृता अनिल कोळपकर यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन साकुर परिसरातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत निवेदन सादर केले.

यावेळी साकुर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली. तसेच टेकडवाडी ते साकुर दरम्यान असलेल्या के. टी. वेअरचे रुंदीकरण करून संरक्षक कठडे बसविण्याची आवश्यकता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. साकुर चौफुली परिसरात वारंवार होणाऱ्या विजेच्या लपंडावामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगत, तेथील ट्रांसफार्मरवर ओव्हरलोड होत असल्याने तातडीने १०० केव्ही क्षमतेचे नवीन ट्रांसफार्मर मंजूर करावेत, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय साकुर परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी एक पोलीस निरीक्षक व दोन पोलीस कॉन्स्टेबल कायमस्वरूपी नियुक्त करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. अमृता कोळपकर यांनी पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्याशी विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करत परिसरातील नागरिकांच्या अडचणी मांडल्या. मागील निवेदनांबाबतही सकारात्मक चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी आ. अमोल खताळ, डॉ. अशोक इथापे, बाळासाहेब कोंडाजी खेमनर, बाबासाहेब कुटे, गुलाब भोसले, रऊफ शेख, अमित धुळगंड, संदीप खिल्लारी, ईशाक पटेल, बाळू खेमनर आदी उपस्थित होते.

## तालुक्याला हक्काचे...

पान १ वरून - घेतल्याने शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये आर्थिक समृद्धी येणार आहे. तालुका कार्यक्षेत्रात १५ लाख मेट्रिक टनाचे उद्दिष्ट ठेवले तर कारखाना स्वयंपूर्ण होऊन कायम सर्वाधिक दिला जाईल असे ते म्हणाले.

तर शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने घेतलेल्या ऊस विकास मेळाव्यांमधून शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती होत असून एकरी उत्पादन वाढवण्यासाठी फायदा होणार आहे. सर्व शेतकऱ्यांनी ऊस लागवडीपूर्वी माती परीक्षण करणे गरजेचे आहे. पाचटाचा वापर हा खत म्हणून करा पाचटामध्ये सेंद्रिय कर्ब जास्त असल्याने हे खत जमिनीसाठी अत्यंत पोषक आहे. चांगले बियाणे, ठिबक सिंचन व ठिबक मधून खते देण्याचे प्रमाण याचबरोबर सरी मधील पाच फूट अंतर महत्त्वाचे असून नवीन तंत्रज्ञानाचा प्रत्येक शेतकऱ्याने वापर करावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी चंद्रकांत कडलग, ऊस उत्पादक रवींद्र भोकनळ,सतीश खताळ, मधुकर गुंजाळ, सोमनाथ गुंजाळ, सुभाष गुंजाळ, मोहनराव करंजकर, शांताराम दुबे, कारखान्याचे सेक्रेटरी किरण कानवडे, कृष्णा दिघे, कृषी अधिकारी भाऊसाहेब खर्डे ऊस विकास अधिकारी बाळासाहेब सोनवणे यांच्यासह विविध ऊस उत्पादक कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले तर पांडुरंग पाटील घुले यांनी आभार मानले. ऊस लागवड करताना सर्व शेतकऱ्यांनी आपल्या उसाची नोंदणी ही तीन महिने अगोदर करावी. त्यानंतर कारखान्याच्या ऊस विकास विभागाच्या वतीने माती परीक्षण, ऊस बेणे, औषध याबाबत सर्व मार्गदर्शन केले जाईल. ऊस लागवड आणि ऊस तोडणी यामध्ये नियोजन करणे आवश्यक असल्याचे मा. कृषी मंत्री थोरात यांनी म्हटले आहे.


## टेंडर नोटीस

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँकेस त्यांच्या नव्याने उघडणाऱ्या घारगाव शाखेचे फर्निचर तसेच इलेक्ट्रीक काम करायचे आहे. त्यासाठी बँकेच्या वेबसाईटवर टेंटरसबंधीत सर्व कागदपत्रे उपलब्ध केलेली आहेत. सबंधीत कंत्राटदारांनी बँकेच्या साईटवरून टेंडर डाऊनलोड करावे आणि आपल्या कागदपत्रांसह व बोलीसह बँकेच्या कार्यालयात दिनांक २५/०५/२०२६ पर्यंत मा. चेअरमन सो/ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष टेंडर निविदा जमा करावी.

वेबसाईटचा पत्ता www.smbt.bank.in

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME KUNDAN CHANGDEO KORADE

TO NEW NAME AS KUNDAN CHANGDEV KORADE

Add- Lingdev, Tal- Akole Dist- Ahilyanagar

**पाहिजेत**

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.

हेल्पर - 01

संपर्क- नेहरु चौक, संगमनेर

9922113534 9730468090

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**त्वरित पाहिजेत**

पेट्रोल पंप वर २ कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक उमेदवारांनी संपर्क करावा

पत्ता - चैतन्य पेट्रोलियम, संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी

8888808397

**पाहिजेत**

पुरुष रिसेप्शनिस्ट

वय २० ते ३५

अनुभवास प्राधान्य, बँकिंग व्यवहाराचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान व स्वतःची दुचाकी व लायसन्स आवश्यक

नविन नगर रोड, संगमनेर

8378956909 8459199913

**पाहिजेत**

अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत

जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)

मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर

9822523424

**पाहिजेत**

स्वयंपाकीन – ०१ (२ व्यक्तींचा स्वयंपाक)

ड्रायव्हर – ०१

क्लार्क – ०१ (लेडीज/जेन्ट्स)

वॉचमन – ०१

अनुभवास प्राधान्य

9822334431

**पाहिजेत**

पसायदान चिल्ड्रन क्लिनिक अ‍ॅण्ड नर्सिंग होम

ताजणे मळा, नविन नगर रोड, संगमनेर

डॉक्टर – BAMS / BHMS (सकाळ–१, रात्री –१)

नर्स – ANM / GNM (सकाळी –१, दुपारी–१, रात्री –२)

लॅब टेक्निशिअन (सकाळी –१, रात्री –१)

९९६०६१०६२३

**ड्रायव्हर पाहिजे**

ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा

मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा

निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे

8668269897

**त्वरित पाहिजेत**

ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व साईट व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे

9421911671

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९ ७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी








संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)

मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# अकोले तालुक्यात ५५ अल्पवयीन मुली गरोदर

## राज्यभर खळबळ, बाल हक्क आयोगाकडून सखोल चौकशीचे आदेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले : अकोले तालुक्यातील बालविवाह आणि अल्पवयीन मुलींच्या गरोदरपणाचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महिला व बालविकास विभागाने ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान केलेल्या सर्व्हेमध्ये तब्बल ५५ अल्पवयीन गरोदर मातांची नोंद आढळून आल्याने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. या धक्कादायक प्रकाराची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेत सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणामुळे अकोले तालुक्यातील बालविवाहाचे वाढते प्रमाण आणि अल्पवयीन मुली पळून जाण्याच्या घटनांबाबत चिंता अधिक तीव्र झाली आहे. या संदर्भात अकोले तालुका बाल संरक्षण समितीचे अशासकीय सदस्य श्रीनिवास रेणुकादास यांनी प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर आयोगाचे सचिव पंकज देवरे यांनी मुंबई येथे विशेष सुनावणी आयोजित केली.

या सुनावणीसाठी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महिला व बालविकास विभागाचे अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, बालकल्याण समितीचे पदाधिकारी आणि तक्रारदारांना नोटीस बजावण्यात आली होती.

आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय विष्णू पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुनावणीत आयोगाच्या सदस्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची कसून चौकशी केली. प्राथमिक तपासात बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ आणि पोक्सो अधिनियम २०१२ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट संकेत असल्याचे आयोगाने नमूद केले. सुनावणीदरम्यान महिला व बालविकास विभागाने अखेर ५५ अल्पवयीन गरोदर मातांची वस्तुस्थिती मान्य केली. यावर आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त करत, इतक्या गंभीर प्रकरणात प्रशासनाने तत्काळ कारवाई का केली नाही? असा थेट सवाल अधिकाऱ्यांना केला. दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सन २०२१ पासून अशा स्वरूपाचे २१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक खांडबहाले यांनी १२, तर सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी ९ गुन्ह्यांची माहिती आयोगासमोर मांडली. बालविवाहाच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी राज्यभर विशेष कृती कार्यक्रम राबविण्यात येणार असून लवकरच कठोर नियमावली आणि धोरण जाहीर केले जाईल, असे आयोगाचे अध्यक्ष ॲड. पुराणिक यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अहिल्यानगर महिला व बालविकास विभागाने गेल्या वर्षभरात १५५ बालविवाह रोखण्यात यश मिळवले असून 'बालविवाह मुक्त भारत अभियान' अंतर्गत जिल्ह्यातील २ लाख ६५ हजार नागरिकांनी ऑनलाइन शपथ घेतल्याची माहिती देण्यात आली आहे.

# पठार भागातील विकास कामांचा निधी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या काळातील - मीराताई शेटे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-साकुर पठार भागातील विविध गावांबरोबरच साकुर ते बिरेवाडी रणखांबवाडी ते डिग्रस या रस्त्यांसाठीचा निधी हा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळातील ऑक्टोबर २०२४ मध्ये मंजूर झालेला आहे. नवीन लोकप्रतिनिधीने एक रुपयाही निधी मिळवला नसून आयत्या पिठावर रेघोट्या मारण्याचे काम बंद करा अशी टीका जिल्हा परिषदेच्या माजी सभापती सौ मीराताई शेटे यांनी केली आहे.

बिरेवाडी येथे पालकमंत्री व नवीन लोकप्रतिनिधी यांनी ऑक्टोबर २०२४ पूर्वी मंजूर झालेल्या कामांचा शुभारंभ केला. याबाबत बोलताना मीराताई शेटे म्हणाल्या की, साकुर पठारातील डिग्रस ते रणखांबवाडी हे काम लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या निधी अंतर्गत होते. साकुर ते बिरेवाडी आणि तासकरवाडी ते खंडेरायवाडी या सुमारे १७ कोटींच्या रस्त्याच्या कामासाठी आपण बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा केला.

ही सर्व कामे २०२४ पूर्वीच मंजूर झालेली आहे. याबाबतची सर्व पुरावे आपल्याकडे आहेत. ही कामे मंजूर होण्यासाठी यशोधन कार्यालय व इंद्रजीत थोरात यांची मोठी मदत झाली. मंत्रालयापर्यंत या कामांच्या निधीसाठी पाठपुरावा केला.

नवीन लोकप्रतिनिधी मागील दीड वर्षापासून काम करत आहे. मात्र एक रुपयाचाही नवीन निधी त्यांनी आणलेला नाही.



बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात मंजूर झालेली अनेक रस्त्यांची कामे त्यांनी रद्द केली. कोणतीही नवीन काम आणले नाही आता त्यांनी निधी आणावा आणि खुशाल उद्घाटने, भूमिपूजन करावी. मात्र जुन्या कामावर भूमिपूजन करू नये.

तालुक्यावर बाह्य शक्तींचे आक्रमण असून नवीन लोकप्रतिनिधी स्वत: काही करू शकत नाही हेच सर्व जनतेला माहित आहे. पठार भागातील ज्या लोकांची कामांमध्ये योगदान नाही अशा लोकांना घेऊन नवीन लोकप्रतिनिधीने भूमिपूजन व उद्घाटनाचा घाट घातला हे अत्यंत चुकीचे आहे.

<u>लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात तालुक्यातील ग्रामीण भागात रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात मंजूर झाली मात्र ऑक्टोबर २०२४ नंतर नवीन लोकप्रतिनिधीने सर्व कामे रद्द केली. नवीन एक रुपयाचा निधी आणला नाही जुन्याच कामांचे उद्घाटने सुरू केले आहेत. काम न करता प्रसिद्धी करणे फ्लेक्स लावणे हेच कामे नवीन सत्ताधारी करत असल्याची टीकाही त्यांनी केली.</u>

## जिल्ह्यातील चारा जिल्ह्यातच वापरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- अहिल्यानगर जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करत जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्ह्यात उत्पादित होणारा हिरवा व कोरडा चारा, मुरघास तसेच टोटल मिक्स राशन (टी.एम.आर.) यांची इतर जिल्ह्यांमध्ये वाहतूक करण्यास मनाई करणारा आदेश जारी केला आहे. हा आदेश पुढील दोन महिन्यांसाठी लागू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# उत्सव कला व क्रीडा अकादमी पदग्रहण सोहळा उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर येथे नुकताच उत्सव कला व क्रीडा अकादमीचा पदग्रहण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संगमनेरच्या सांस्कृतिक चळवळीला नवी दिशा आणि ऊर्जा देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या या अकादमीच्या पदग्रहण सोहळयास पद्मश्री पुरस्कार विजेते कलाभूषण रघुवीर खेडकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे होते.




यावेळी बोलताना रघुवीर खेडकर यांनी संगमनेरच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव करताना सांगितले की, संगमनेरने साहित्य, कला आणि नाट्यक्षेत्राला अनेक गुणी कलाकार दिले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात संगमनेरची स्वतंत्र ओळख ही साहित्यिक, कलावंत आणि उत्तम रसिकांचे गाव म्हणून आहे. संगमनेरचा प्रत्येक माणूस वेगळा विचार करणारा आहे, हीच येथील खरी ताकद आहे. एका कलावंताला पद्मश्री पुरस्कार मिळणे ही संगमनेरसाठी अभिमानाची बाब आहे. मात्र हा सन्मान मिळाल्यानंतरही मी जमिनीवर राहिलो, त्याचे श्रेय संगमनेरच्या नागरिकांनाच जाते. पुढील काळात सांस्कृतिक चळवळीसाठी माझ्याकडून शक्य ते योगदान देईन, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुधीर तांबे यांनी सांगितले की, संगमनेरमधील कलावंत आणि खेळाडूंना सक्षम व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कला आणि कौशल्यांना संधी मिळावी या उद्देशाने उत्सव कला व क्रीडा अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. त्यांनी संगमनेरच्या सांस्कृतिक चळवळीच्या इतिहासाचा आढावा घेत, नगराध्यक्ष असताना आम्ही 'संग्राम' संस्थेची स्थापना केली होती. त्या माध्यमातून अनेक कलाकार घडले. नव्या पिढीने सांस्कृतिक माध्यमातून समाजप्रबोधन करणे काळाची गरज आहे. सर्व कलावंत आणि खेळाडूंच्या पाठीशी आम्ही कायम उभे राहू, अशी ग्वाही दिली.

या प्रसंगी आयोजित मुक्त संवाद कार्यक्रमात प्रा. जितेंद्र पाटील, अमोल शेलकर, राजन झांबरे आणि राम अरगडे यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमास उपनगराध्यक्ष नूरमोहम्मद शेख, नगरसेवक योगेश जाजू, ड. नइम इनामदार, छात्रभारतीचे अनिकेत घुले, हिरालाल पगडाल यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. शशिकांत माघाडे यांनी केले. विकास भालेराव यांनी सुरेल नमन सादर केले.

घोषित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे - अध्यक्ष - शशिकांत माघाडे, उपाध्यक्ष - याह्याखान, ज्ञानेश्वर वर्पे, सचिव - ॲड. अमित सोनवणे, खजिनदार - गिरीष पाटणकर, सहखजिनदार - राजेश माघाडे, कला विभाग प्रमुख - विकास भालेराव, क्रीडा विभाग प्रमुख - सुनील मंडलिक, विश्वस्त - राजा वराट, भाऊसाहेब नरवडे, बाळासाहेब दासरी, सहसचिव - सुनील एकार, सुहास लेंडे, प्रकल्प संयोजक - प्रा. जितेंद्र पाटील, प्रा. नानासाहेब गुंजाळ, प्रसिद्धी प्रमुख - हरीश कांगणे, महिला विभाग - रंजना पवार, कार्यकारिणी सदस्य - सुरेंद्र गुजराथी, राम चन्ना, बाबासाहेब मोकळ, जालिंदर पानसरे, रविंद शिंदे, रवींद्र पगार, महेश घुले, विवेक तिवारी, संगीता परदेशी, संदीप देशमुख.

## २० मे रोजी होणारा रोजगार मेळावा स्थगित

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने दि. २० मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा (ऑटोमोबाईल सेक्टर) महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे स्थगित करण्यात आला आहे. या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी नोंदणी केलेले उमेदवार, प्रशिक्षण संस्था, महाविद्यालये तसेच संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त योगेश उगले यांनी केले आहे.

# चेक बाऊंस प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

युवावार्ता (प्रतिनिधी)

सोन्याच्या खरेदी-विक्रीच्या व्यवसायातून उधारीपोटी मिळालेला तीन लाख रुपयांचा धनादेश न वटल्याचा दावा करणाऱ्या फिर्यादीला न्यायालयात आपला अधिकृत व्यवसाय सिद्ध करता आला नाही. त्यामुळे न्यायालयाने संशयाचा फायदा देत आरोपीची गुन्हातून निर्दोष मुक्तता केली आहे. संगमनेर मधील एका महत्त्वपूर्ण फौजदारी खटल्यात अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी चं. प्र. रघुवंशी यांनी हा निवाडा केला.

या खटल्याची पार्श्वभूमी अशी की, फिर्यादी समीर रमेश महाले ( संगमनेर) यांचा सोन्याचा व्यवसाय असून आरोपी संतोष यादवराव काळे (रा. नेहरू चौक) यांच्याशी त्यांची मैत्री होती. फिर्यादीच्या दाव्यानुसार, आरोपीने २० ऑक्टोबर २०२२ रोजी त्यांच्याकडून ४ लाख ५० हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे कडे उधारीवर खरेदी केले होते. त्यापैकी काही रक्कम रोख देऊन उर्वरित ३ लाख रुपये एका महिन्याच्या आत देण्याचे आश्वासन दिले होते.

ठरलेल्या मुदतीनंतर फिर्यादीने पैशांची मागणी केली असता, आरोपीने बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा संगमनेरचा ३ लाख रुपयांचा धनादेश दिला. मात्र, फिर्यादीने हा धनादेश बँकेत जमा केला असता 'खाते बंद' असल्याचा शेरा मिळून तो अनादरीत झाला. यानंतर कायदेशीर नोटीस पाठवूनही रक्कम न मिळाल्याने समीर महाले यांनी न्यायालयात नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स क्ट कलम १३८ अन्वये तक्रार दाखल केली होती.

न्यायालयीन सुनावणी दरम्यान संतोष काळे यांच्या वतीने विधीज्ञ संतोष दत्तात्रय इटप यांनी फिर्यादीच्या दाव्याला आव्हान दिले. फिर्यादीचा कोणताही सोन्याचा व्यवसाय नाही, तर ते बेकायदेशीर भिशी व व्याजाचा धंदा चालवतात. भिशीच्या सुरक्षेसाठी सुरुवातीलाच घेतलेल्या धनादेशाचा फिर्यादीने गैरवापर करून ही खोटी केस दाखल केली आहे. असा बचाव केला. आरोपीच्या बचावाला दुजोरा देण्यासाठी निलेश संजय भावसार या साक्षीदाराची साक्ष घेण्यात आली, जो पूर्वी फिर्यादीकडे वसुलीचे काम करत होता. त्यानेही फिर्यादीचा सोन्याचा व्यवसाय नसल्याचे स्पष्ट केले.

खटल्याच्या सुनावणीत फिर्यादीने सादर केलेल्या पुराव्यांवरून अनेक गंभीर बाबी समोर आल्या. फिर्यादीने 'शिवसाई ज्वेलर्स' नावाचे जे बिल न्यायालयात सादर केले होते, त्यावर व्हॅट आणि सीएसटी क्रमांक नमूद होते. परंतु, उलटतपासणीत फिर्यादीने मान्य केले की २०२० मध्ये जीएसटी आल्यामुळे त्यांनी व्हॅट आणि सीएसटी अकाउंट बंद केले होते, तरीही २०२२ च्या बिलावर ते क्रमांक होते. याशिवाय फिर्यादीकडे दुकानाचा कोणताही आस्थापना परवाना नव्हता, ते आयटी रिटर्न भरत नव्हते आणि दुकानाच्या नावे कोणत्याही बँकेत खातेही नव्हते. ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स नियमांनुसार आवश्यक असणारे नोंदणी प्रमाणपत्रही फिर्यादी सादर करू शकले नाहीत.

न्यायाधीश चं. प्र. रघुवंशी यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि पुराव्यांच्या आधारे स्पष्ट केले की, धनादेश 'खाते बंद' असल्यामुळे अनादरीत झाला आणि फिर्यादीने मुदतीत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली, ही बाब सिद्ध होते. परंतु, ज्या मूळ व्यवसायाच्या व्यवहारातून हे कायदेशीर देणे निर्माण झाल्याचा दावा फिर्यादीने केला आहे, तो व्यवसायच संशयाच्या भोवऱ्यात आहे.

जर व्यवसायच सिद्ध होत नसेल किंवा तो बेकायदेशीर असेल, तर त्यातून निर्माण झालेले देणे कायदेशीर मानले जाऊ शकत नाही. परिणामी, आरोपीने आपल्यावरील कायदेशीर गृहीतके शक्यतांच्या आधारावर यशस्वीरीत्या खोडून काढल्याचे न्यायालयाने नमूद केले. फिर्यादीला आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यात अपयश आल्यामुळे न्यायालयाने आरोपी संतोष यादवराव काळे यांची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश दिला.

## अनधिकृत बांधकामांवर

पान १ वरून -

वाहतूक कोंडी आणि पार्किंगचा वाढता प्रश्न लक्षात घेऊन मुख्याधिकारी गोरे यांनी आणखी एक गंभीर इशारा दिला. शहरातील हॉस्पिटल्स, मोठे मॉल्स, दुकाने आणि व्यावसायिक संकुलांकडे स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था असणे कायद्याने अनिवार्य आहे. मात्र अनेक ठिकाणी पार्किंगच्या जागेतच व्यावसायिक वापर सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा आस्थापनांवर थेट सील ठोकण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गुंठेवारी भागातील बांधकामधारकांनाही शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन आपली बांधकामे नियमित करून घेण्याचे आवाहन करण्यात आले. राज्याच्या नव्या नगररचना धोरणानुसार संगमनेर शहराला वाढीव एफएसआय मिळणार असल्याने भविष्यात शहरात अधिक नियोजनबद्ध आणि उंच इमारती उभारण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचेही सांगण्यात आले. नगरपालीकेने नव्याने घेतलेल्या या धोरणाचा अनेकांना फटका बसणार असला तरी भविष्यात शहराच्या विकासाला मात्र चालना मिळणार आहे.




दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पत्ता : दैनिक युवावार्ता कार्यालय, एस.टी. स्टँडजवळ, नविन अकोले रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहमदनगर (महाराष्ट्र),फोन (०२४२५) २२५१२९
Mobile : +91 9822039460, Email : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252
शासनमान्य यादीतील जिल्हास्तरीय दैनिक

Print ▸ Electronic ▸ Social Media ▸ Events ▸ Publications ▸ Magazine

दिनांक -१५/०५/२०२६

प्रिंट व डिजिटल पत्रकारीता प्रशिक्षणासाठी

श्रमसंस्कार व श्रमप्रतिष्ठा प्रकल्प

दैनिक युवावार्ता उपक्रमशील वृत्तपत्र असून ''**परिवर्तनाचा पुरस्कर्ता**'' हे ब्रिदवाक्य स्विकारून १८ वर्षापासून यशस्वी वाटचाल करीत असताना. संगमनेर - अकोले विद्यार्थ्यांसाठी दररोज दोन /चार तास '**कमवा - शिका**' योजनेप्रमाणे काम करण्याची संधी उपलब्ध करून देत आहे. कोणत्याही व्यक्तिच्या शिक्षणाबरोबरच श्रमसंस्काराद्वारे श्रमप्रतिष्ठा वाढावी म्हणून या प्रकल्पाचे प्रयोजन आहे. प्रसार माध्यम क्षेत्रातील प्रिंट व डिजिटल मिडिया प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्याना स्वावलंबी करणारा हा उपक्रम आहे.या उपक्रमात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा,सहभागी विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाईल.

तसेच संगमनेर शहरातील दैनिक युवावार्ता वाचकांना संध्याकाळी ५:३० ते ७:३० या वेळेत युवावार्ता अंक पोहच करणे. महिना पूर्ण होताच ५० रू. बीलाप्रमाणे वसूली करून कार्यालयात जमा करणे, या प्रकारचे दोन तासाचे कामासाठी ३००० रूपये दर महिन्यास मानधन दिले जाईल.तसेच दररोज चार तास देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जाहिरात संपर्क, बातमी संकलन, जाहिरात निर्मिती, मार्केटिंग या प्रकारचे कामासाठी प्रशिक्षणार्थी म्हणून दरमहा ५००० रूपये दर महिन्यास मानधन दिले जाईल. पुर्ण वेळ (आठ तास) काम करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पात्रतेनुसार संधी दिली जाईल.

- **हा उपक्रम विद्यार्थीनींसाठी नाही.**
- **इच्छूक विद्यार्थ्यांनी त्यांची माहिती फोटोसह व्हॉटसअॅप किंवा ई-मेलवर पाठवावी.**
- **निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील माहिती मुलाखती द्वारे दिली जाईल.**



श्रमसंस्कारांनी डॉ.अब्दुल कलाम देशाचे राष्ट्रपती झाले.
श्रमसंस्कारांनी लाल बहादूर शास्त्री देशाचे पंतप्रधान झाले.

व्हॉटसअॅप नं. - ९८२२०३९४६०
ईमेल - dailyyuvavarta@gmail.com

प्रकल्प प्रमुख
दैनिक युवावार्ता,
संगमनेर




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com









# बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बुधवारी गुणगौरव सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघ आणि राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता बारावी (एच.एस.सी.) परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा सत्कार समारंभ बुधवार, दि. २० मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, नेहरू गार्डन, संगमनेर येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

यंदा संगमनेर तालुक्यातील सुमारे २१ विद्यार्थ्यांनी बारावी परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उज्ज्वल यश संपादन केले आहे. यामध्ये शहरातील श्रमिक ज्युनिअर कॉलेजचे १५ विद्यार्थी, ओहरा ज्युनिअर कॉलेजचे ३ विद्यार्थी तसेच सह्याद्री ज्युनिअर कॉलेजचे २ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह वरील कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघ व कळसकर प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष प्राचार्य ज्ञानेश्वर गोंटे यांनी केले आहे.

तसेच ज्येष्ठ नागरिक, पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ कळसकर गुरुजी यांनी केले आहे.

ज्येष्ठ नागरिक संघाने आयोजित केलेल्या केलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे व आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दंडे गोल्ड अॅण्ड डायमंड्समध्ये "पायल व जोडवी महोत्सवा"ची सुरुवात




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महिलांच्या सौंदर्यात आणखी भर घालणाऱ्या आकर्षक पायल आणि जोडवीच्या असंख्य नवीन डिझाईन्सचा भव्य पायल व जोडवी महोत्सव दंडे गोल्ड अॅण्ड डायमंड्सतर्फे मोठ्या उत्साहात सुरू करण्यात आला आहे. हा विशेष महोत्सव संगमनेर, सिन्नर आणि नाशिक रोड येथील तिन्ही शाखांमध्ये ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

या महोत्सवाच्या निमित्ताने ग्राहकांना पायल आणि जोडवीच्या मजुरीवर तब्बल २५ टक्क्यांपर्यंत आकर्षक सूट देण्यात येत असून, महिलांसाठी ही खरेदीची खास पर्वणी ठरत आहे. यामध्ये ५००० पेक्षा अधिक पारंपरिक व आधुनिक डिझाईन्सचे आकर्षक कलेक्शन ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे मथुरा, आग्रा, राजकोट, कोल्हापूर आणि मुंबई येथून निवडक आणि लेटेस्ट व्हरायटी आणण्यात आली आहे. यामध्ये लाईटवेट, हेवीवेट, स्टोन, कुंदन, मीना वर्क, मारवाड पॅटर्न यांसारख्या उत्कृष्ट कलाकुसरीच्या विविध प्रकारांचा समावेश असून, प्रत्येक डिझाईन महिलांच्या आवडीनुसार साकारण्यात आले आहे. दैनंदिन वापर, ऑफिसला जाणाऱ्या महिला, कॉलेज युवती तसेच गृहिणी यांना लक्षात घेऊन प्रत्येक वयोगटासाठी खास पायल आणि जोडवीचे आकर्षक कलेक्शन सादर करण्यात आले आहे. जीन्स, स्कर्ट, साडी तसेच पंजाबी ड्रेसवर खुलून दिसणाऱ्या विविध स्टायलिश डिझाईन्स एकाच छताखाली उपलब्ध असल्याने ग्राहकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

याशिवाय फॅन्सी जोडवीच्या असंख्य मनमोहक डिझाईन्स महिलांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. तसेच जुनी चांदी देऊन नवीन चांदीच्या पायल घेण्याची सुविधा आणि आकर्षक बजेट रेंजमुळे ग्राहकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. हा विशेष पायल व जोडवी महोत्सव १५ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार असून, अधिकाधिक ग्राहकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन दंडे गोल्ड अॅण्ड डायमंड्सच्या संचालिका सौ. सुप्रिया दंडे आणि सौ. मीना दंडे यांनी केले आहे.

# । वाढदिवस अभिष्टचिंतन ।

संगमनेर तालुक्यातील छोट्याशा देवकौठे गावातून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे मा. श्री. सुभाषभाऊ सांगळे यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा..!

अगदी सामान्य कुटुंबातून, छोट्याशा गावातून सुरू झालेला प्रवास पण मोठी स्वप्नं, अथक परिश्रम, प्रामाणिकपणा आणि माणुसकीच्या जोरावर आज सुभाषभाऊंनी अहिल्यानगर जिल्ह्यासह संगमनेर तालुक्यात एक यशस्वी आणि विश्वासार्ह कॉन्ट्रॅक्टर म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. माणसांची ओळख केवळ पैशाने किंवा पदाने होत नसते; ती त्यांच्या स्वभावाने, माणुसकीने, समाजासाठी असलेल्या तळमळीने आणि गरजूंना दिलेल्या मदतीच्या हाताने निर्माण होत असते. आपल्या गोड स्वभावाने, आपुलकीने, प्रेमाने आणि सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने सहभाग नोंदवत सुभाषभाऊंनी असंख्य माणसं जोडली आहेत. लोकनेते बाळासाहेब थोरात साहेबांचे एकनिष्ठ व विश्वासू सहकारी म्हणून त्यांनी नेहमीच काम केले आहे. नामांकित शॅम्प्रो संस्थेचे व्हा. चेअरमन तसेच जिल्हा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला आहे. तळेगाव,निमोण परिसरा पासून संपूर्ण तालुक्यात युवकांपासून ज्येष्ठांपर्यंत त्यांचा दांडगा जनसंपर्क आणि लोकांमध्ये असलेला आदर हा त्यांच्या कामाची खरी पावती आहे.


सदैव माणसांमध्ये राहणारे, सुख-दुःखात धावून जाणारे आणि प्रत्येकासाठी मदतीचा हात पुढे करणारे सुभाषभाऊ यांना उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा..! आपल्या कार्याचा आणि कर्तृत्वाचा प्रवास असाच निरंतर उंचावत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना..!




# भंडारदरा पाणलोटात काजव्यांचे आगमन

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - भंडारदरा भंडारदरा पाणलोटात तुरळक प्रमाणात काजव्यांचे आगमन झाले आहे. हे प्रमाण हळूहळू वाढत जात आगामी काही दिवसांत काजव्यांची मायावी दुनिया येथे अवतरणार असून, पर्यटकांना पर्वणी मिळणार आहे. दरम्यान काजव्यांचे आगमन होत असल्याने यंदा पाणलोटात लवकरच मान्सूनचे आगमन होणार असल्याचा आदिवासी बांधवांचा सांगितले. त्यामुळे या भागात शेती कामांनी वेग घेतला आहे.



वळवाचा पाऊस झाल्याने सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात काजवांच्या मिलनाचा उत्सव सुरू झाला आहे. जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी लुकलुकणारे काजवे दिसू लागले आहेत. आठ-दहा दिवसांत काजव्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

अनेक पर्यटन संस्थांकडून महोत्सवांचे आयोजन नागरिकांना निसर्गाचा हा अद्भुत चमत्कार दाखविण्यासाठी अनेक पर्यटन संस्थांनी काजवा महोत्सवांचे आयोजन केले आहे.

दरवर्षी मे महिन्याचा शेवटचा पंधरवडा आणि जून महिन्याचा पहिला पंधरवडा या दरम्यानच्या काळात अहिल्यानगर जिल्ह्यातील भंडारदरा-घाटघर परिसरातील वृक्षराजीवर काजव्यांची ही मायावी दुनिया अवतरते.

राज्यातील सर्वांत उंच असलेल्या कळसूबाईच्या पायथ्याशी वसलेल्या उडदावणे, पांजरे, मुरशेत, भंडारदरा, चिचोंडी, बारी, मुतखेल, कोळटेंभे या आदिवासी खेड्यांच्या शिवारात तसेच रंधा धबधब्याजवळ हजारो झाडे लक्षावधी काजव्यांनी लगडली जातील. हिरडा, बेहडा, सादडा, जांभूळ, आंबा, उंबर अशा निवडक झाडांवरच काजव्यांचा हा काही दिवसांचा 'बसेरा' वाढणार आहे. हे सौंदर्य न्याहाळण्यासाठी पर्यटकांची पावले या भागाकडे वळणार आहेत.

















दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25